शनिवार दि. १० ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ३८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालन्यात अवैध शस्त्रसाठ्याचा पर्दाफाश; सहा गावठी पिस्टल, दोन इम्पोर्टेड पिस्टल अन् खंजर जप्त

## शस्त्रविक्री करणारा मुख्य आरोपी भिमा वाघमारे जेरबंद; चार संशयितांचा शोध सुरू, ६.६० लाखांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात अवैध शस्त्रविक्रीचे जाळे सक्रिय असल्याचे समोर आले असून, कदीम जालना पोलिसांनी मोठी कारवाई करत सहा गावठी बनावटीचे पिस्टल, दोन इम्पोर्टेड पिस्टल, एक धारदार खंजर आणि जिवंत काडतुसे असा अवैध शस्त्रसाठा जप्त केला आहे. या प्रकरणात जालना शहर व परिसरात अवैध शस्त्रविक्री करणारा मुख्य आरोपी भिमा भाऊराव वाघमारे (वय २३, रा. सोलगव्हाण, ता. जालना) याला पोलिसांनी अटक केली असून, अन्य चार पाहिजे आरोपींचा शोध सुरू आहे. या कारवाईत एकूण ६ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी पत्रकार परिषदेत दिली. शुक्रवारी (दि. ९ ऑक्टोबर) पोलीस अधीक्षक कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत या कारवाईचा तपशील उघड करण्यात आला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी आणि कदीम जालना पोलीस ठाण्याचे निरीक्षक जनार्दन शेवाळे यांच्या कामगिरीचे पोलीस अधीक्षकांनी विशेष कौतुक केले. तसेच, या कारवाईत सहभागी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना बक्षीस देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे ७.२० वाजता कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, छत्रपती संभाजीनगर रोडवरील विशाल कॉर्नर परिसरात एक व्यक्ती अवैध शस्त्रांसह उभी असून, ती खुनासारखा गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत आहे. या माहितीची गांभीर्याने दखल घेत पोलीस निरीक्षक शेवाळे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत अवगत केले. पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने पथक तयार करण्यात आले.

पोलिस पथकाने विशाल कॉर्नर परिसरात सापळा रचला. त्यानंतर भवानीनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर रात्री सुमारे ८.१५ वाजता संशयित भिमा वाघमारे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून दोन पिस्टल, मॅगझिनमध्ये सात जिवंत काडतुसे आणि आयफोन कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला. त्यानंतर करण्यात आलेल्या तपासात या प्रकरणाचे धागेदोरे अवैध शस्त्रविक्रीपर्यंत पोहोचल्याचे पोलिसांनी सांगितले. प्राथमिक कारवाईनंतर पोलिसांनी आरोपीकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे अन्य पाहिजे आरोपीच्या घराची झडती घेतली. या झडतीत आणखी पिस्टल, जिवंत काडतुसे आणि धारदार खंजर आढळून आल्याने अवैध शस्त्रसाठ्याचे प्रकरण उघडकीस आले. पोलिसांनी दिलेल्या तपशिलानुसार, जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये सहा गावठी बनावटीचे पिस्टल, दोन ऑटोमॅटिक पिस्टल, एक धारदार खंजर आणि जिवंत काडतुसे यांचा समावेश आहे.



याशिवाय, आरोपीकडून मोबाईल फोनही जप्त करण्यात आला आहे. या शस्त्रांचा पुरवठा नेमका कोठून होत होता, त्यांची विक्री कोणाला करण्यात आली आणि या व्यवहारांमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. भिमा वाघमारे हा जालना शहर व आजूबाजूच्या परिसरात अवैध शस्त्रांची विक्री करणारा मुख्य आरोपी असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यामुळे ही कारवाई केवळ शस्त्रजप्तीपुरती मर्यादित न राहता, शहरातील अवैध शस्त्रपुरवठ्याचे जाळे उघड करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. जप्त केलेली शस्त्रे कुठून आणली जात होती, त्यांची विक्री करण्यासाठी कोणत्या माध्यमांचा वापर केला जात होता, तसेच या शस्त्रांचा वापर यापूर्वी कोणत्या गुन्ह्यांमध्ये झाला आहे का, या दिशेने तपास होण्याची शक्यता आहे. मात्र, या बाबींचा अंतिम निष्कर्ष तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. या प्रकरणातील चार पाहिजे आरोपींचा शोध सुरू असल्याने पुढील तपासात आणखी माहिती समोर येण्याची अपेक्षा आहे. या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५७२/२०२६ नुसार शस्त्र अधिनियमाच्या कलम ३/२५ व ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम ३७(१)(३) चा भंग केल्याप्रकरणी कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक रामदास काळे, मच्छींद्र वाघ, दिनकर मोरे, अमोल चाटे तसेच पोलीस हवालदार सदा राठोड, सचिन चौधरी, धनाजी कावळे, निरंजन चव्हाण, मतीन शेख, इम्रान खान, दिलीप गायकवाड, संदीप चव्हाण आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार सागर बावीस्कर यांनी सहभाग घेतला. या धडक कारवाईमुळे जालना शहरातील अवैध शस्त्रविक्रीच्या व्यवहारांवर प्रकाश पडला असून, या साखळीतील अन्य व्यक्तींचा शोध घेणे आणि शस्त्रांचा संभाव्य गुन्हेगारी वापर तपासणे हे पोलिसांसमोरचे पुढील महत्त्वाचे आव्हान आहे.

---

शासकीय कार्यालयांत स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश

## दर आठवड्याच्या पहिल्या कार्यालयीन दिवशी सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत श्रमदान

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शासकीय कार्यालये स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने विशेष स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. 'सेवा संकल्प अभियान सेवा माझे योगदान' या मोहिमेंतर्गत दर आठवड्याच्या पहिल्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते ११ या वेळेत एक तास श्रमदान करण्यात येणार आहे. या मोहिमेत जालना जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांचे विभागप्रमुख, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. कार्यालयीन परिसर स्वच्छ ठेवणे, अनावश्यक कागदपत्रांची योग्य विल्हेवाट लावणे आणि कर्मचाऱ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. या मोहिमेंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपले टेबल, खुर्ची, कपाट, संगणक आणि इतर कार्यालयीन साहित्य स्वच्छ ठेवावे. अनावश्यक व कालबाह्य कागदपत्रे आणि फाईल्सचे शासनाच्या नियमांनुसार वर्गीकरण करून त्यांची योग्य विल्हेवाट लावावी. तसेच कार्यालयीन आवारातील कचरा, प्लास्टिक आणि टाकाऊ साहित्याची नियमितपणे विल्हेवाट *(पान २ वर)*

## सामाजिक उत्तरदायित्वाचा निधी प्रदूषण नियंत्रणासाठी वापरावे - पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

### जालन्यातील उद्योगांनी प्रदुषण नियंत्रण यंत्रणांमध्ये कालबद्धपद्धतीने सुधारणा करावी

**मुंबई - प्रतिनिधी**

जालना शहरालगतच्या औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण नियंत्रणासाठी लोखंड उत्पादन व भंगार पुनर्प्रक्रिया उद्योगांनी प्रदुषण नियंत्रण मंडळाने सुचविलेल्या उपाय योजनांचा स्वतंत्र कृती आराखडा तयार करून त्याच्या अंमलबजावणीसाठी लघु, मध्यम व दीर्घ मुदतीची कालमर्यादा निश्चित करावी. तसेच प्रदुषण नियंत्रणासंदर्भातील जुन्या यंत्रणा बदलून कालबद्ध पद्धतीने नवीन प्रदूषण नियंत्रण



यंत्रणा अद्ययावत कराव्यात, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी आज दिले. तसेच कंपन्यांनी आपल्या सामाजिक उत्तरदायित्वाचा निधीचा वापर प्रदुषण कमी करण्यासाठी प्राधान्याने करावा, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली.

जालना शहरालगतच्या औद्योगिक वसाहतीतील वाढत्या प्रदूषणाच्या प्रश्नावर पर्यावरणमंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी उद्योग प्रतिनिधी आणि संबंधित अधिकाऱ्यांची आज मंत्रालयातील दालनात बैठक घेतली. यावेळी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार यांच्यासह जालनातील स्टिल उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जालना औद्योगिक परिसरातील अनेक उद्योगांचे प्रकल्प जुने असून लोखंड व स्क्रॅपच्या प्रक्रियेमुळे धूर आणि धूलिकण निर्माण होत आहेत. जुन्या यंत्रणा, अपुरी धूरशोषण व्यवस्था, उद्योग परिसरातील अंतर्गत रस्त्यांवरील धूळ, स्क्रॅप हाताळणी *(पान २ वर)*

## आचारसंहिता संपल्यानंतर नागरी समस्यांच्या पाठपुराव्याला गती देणार : कपिल भुरेवाल

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील स्वच्छता, कचरा संकलन, नालेसफाई, आरोग्यविषयक समस्या आणि इतर नागरी अडचणींबाबत नागरिकांकडून सातत्याने फोन व संदेश प्राप्त होत आहेत. सध्या निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्यामुळे काही प्रशासकीय कामांवर नियमानुसार मर्यादा येत आहेत. त्यामुळे नागरिकांनी परिस्थिती समजून घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन जालना शहर महानगरपालिकेचे नगरसेवक तथा स्वच्छता व आरोग्य सभापती कपिल श्रावणजी भुरेवाल यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून केले आहे. नागरिकांच्या समस्या आणि अपेक्षांची आपल्याला पूर्ण जाणीव असून, त्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले जात नाही. लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांची सेवा करणे हे आपले कर्तव्य आहे. मात्र, आचारसंहितेच्या कालावधीत लागू असलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याने काही कामांसाठी प्रशासकीय प्रक्रियेनुसार पुढील कार्यवाही करावी लागते, असे भुरेवाल यांनी आपल्या संदेशात स्पष्ट केले आहे.

**नागरिकांच्या तक्रारींची दखल घेणार**

शहरातील विविध भागांमध्ये स्वच्छतेचा प्रश्न, नियमित कचरा उचलणे, नाल्यांची साफसफाई आणि आरोग्यविषयक अडचणींबाबत नागरिक आपल्याशी *(पान २ वर)*

---

## बुलढाण्याचे सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शेख अस्लम शेख हमीद यांना राष्ट्रपती पदक प्रदान



**बुलढाणा - प्रतिनिधी**

बुलढाणा पोलीस दलातून एक अत्यंत अभिमानास्पद बातमी समोर येत आहे. आज दिनांक ०९ ऑक्टोबर २०२६ रोजी, राजभवन येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमात महाराष्ट्राचे मा. राज्यपाल श्री जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते बुलढाणा पोलीस दलातील सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्री. शेख अस्लम शेख हमीद यांना सन्मानित करण्यात आले.

पोलीस दलातील त्यांच्या दीर्घ आणि उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना देशाचा सर्वोच्च मानला जाणारा राष्ट्रपती पदक देऊन गौरविण्यात आले आहे. या उल्लेखनीय यशामुळे शेख अस्लम शेख हमीद यांच्यावर त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि पोलीस वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दरम्यान, राष्ट्रपती पदकाने सन्मानित झालेले शेख अस्लम शेख हे दैनिक तेजस एक्सप्रेसचे संपादक शेख उमर (बबलू भाई) यांचे मोठे बंधू आहेत. पोलीस दलातील त्यांच्या या उत्तुंग कामगिरीमुळे बुलढाणा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय पथकाकडून पीक परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी

### नाणेगाव, किणगाववाडी, जामखेड परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधून जाणून घेतली वस्तुस्थिती

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील नाणेगाव तसेच अंबड तालुक्यातील किणगाववाडी आणि जामखेड परिसरातील शेतपिकांची प्रत्यक्ष पाहणी करून पीक परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. पावसाअभावी पिकांच्या वाढीवर झालेला परिणाम, पाण्याची उपलब्धता, संभाव्य पीक नुकसान आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यांची प्रत्यक्ष शेतावर जाऊन



माहिती घेत पथकाने दुष्काळी परिस्थितीची वस्तुस्थिती जाणून घेतली. कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील या केंद्रीय पथकात महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार डॉ. जसपाल सिंग आणि पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ. साक्षी भदौरिया यांचा समावेश होता. यावेळी आमदार नारायण कुचे, राज्याच्या कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, छत्रपती संभाजीनगर विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत चौधरी, बदनापूर उपविभागीय अधिकारी लता बागुल आणि घनसावंगी-अंबड उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी उपस्थित होते. बदनापूर *(पान २ वर)*

# संपादकीय...

## डीजे व्यावसायिकांना श्रीमंत होण्याची गरज आहे; गरीब राहून न्याय मिळत नाही!

लोकशाहीत कायदा सर्वांसाठी समान असतो, असे आपण नेहमी ऐकतो. कायद्यापुढे गरीब-श्रीमंत, सामान्य नागरिक-राजकारणी, व्यापारी-उद्योजक असा कोणताही भेद नसतो, असे संविधान सांगते. पण प्रत्यक्ष व्यवहारात प्रशासनाची दारे कोणासाठी किती वेगाने उघडतात आणि कोणाला त्या दाराबाहेर किती काळ ताटकळत उभे राहावे लागते, हा प्रश्न वारंवार उपस्थित होतो. जालना शहरातील डीजे मालक आणि चालकांच्या रोजगाराचा प्रश्न सध्या याच व्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवणारा ठरत आहे. प्रश्न डीजेच्या आवाजाचा आहे की सामान्य माणसाच्या आवाजाची किंमत कमी असल्याचा? नवरात्रोत्सवाचा उत्साह, दांडियाचे आयोजन, संगीताचा जल्लोष आणि रोषणाई यांचा संबंध केवळ मनोरंजनाशी नाही. या कार्यक्रमांमागे अनेक छोटे व्यावसायिक, डीजे मालक, चालक, तंत्रज्ञ, कामगार, लाइटिंग व्यावसायिक आणि अन्य सेवा पुरवठादारांची रोजीरोटी जोडलेली आहे. एका कार्यक्रमातून मिळणाऱ्या उत्पन्नावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून असतो. व्यवसाय बंद राहिला, तर केवळ एका मालकाचे आर्थिक नुकसान होत नाही; त्याच्याशी जोडलेल्या अनेक हातांचा रोजगारही हिरावला जातो. ध्वनीप्रदूषण रोखणे ही प्रशासनाची कायदेशीर जबाबदारी आहे. न्यायालयीन निर्देश, ध्वनीमर्यादा, वेळेची बंधने आणि सार्वजनिक शांततेचे नियम यांचे पालन झालेच पाहिजे. नागरिकांना मोठ्या आवाजाचा त्रास होऊ नये, रुग्ण, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि रहिवाशांच्या हिताचे संरक्षण व्हावे, याबाबत कोणतीही तडजोड होऊ शकत नाही. मात्र, नियमांची अंमलबजावणी करताना नियम पाळून व्यवसाय करू इच्छिणाऱ्यांसाठी कायदेशीर मार्ग उपलब्ध आहे का, याचा स्पष्ट निर्णय देणेही प्रशासनाचे कर्तव्य नाही काय?

जालना शहरातील डीजे व्यावसायिकांचा आक्षेप हाच आहे. त्यांना नियम मोडण्याची परवानगी नको आहे; नियमांच्या चौकटीत व्यवसाय करण्याची संधी हवी आहे. त्यांची मागणी रास्त आहे की नाही, हे कायदा आणि वस्तुस्थितीच्या आधारे ठरले पाहिजे. परंतु त्यांच्या निवेदनांवर, भेटींवर आणि रोजगाराच्या प्रश्नावर निर्णय न घेता केवळ पुढे ढकलले जात असल्याची भावना निर्माण होत असेल, तर ती प्रशासनासाठी चिंतेची बाब आहे.

अलीकडे डॉक्टरांच्या शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षकांची भेट घेतल्याची आणि त्यासंदर्भात पोलिसांकडून प्रसिद्धिपत्रक जारी झाल्याची बाब समोर आली. आरोग्य क्षेत्रातील प्रतिनिधींनी प्रशासनाची भेट घेणे आणि त्यांच्या प्रश्नांना प्रसिद्धी मिळणे यात गैर काहीच नाही. उलट, प्रत्येक घटकाला आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळाली पाहिजे. परंतु मग रोजगारासाठी संघर्ष करणाऱ्या डीजे मालक-चालकांच्या प्रश्नालाही तितक्याच गांभीर्याने का हाताळले जाऊ नये?

राजकीय पदाधिकाऱ्याचा फोन आला की यंत्रणा वेगाने हलते, प्रभावशाली व्यक्तीने भेट मागितली की वेळ दिला जातो आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम घटकांनी प्रश्न उपस्थित केला की त्याची दखल घेतली जाते, अशी भावना सामान्य नागरिकांमध्ये निर्माण होणे लोकशाहीसाठी धोकादायक आहे. प्रत्येक राजकीय फोनवर नियम वाकवले जातात किंवा प्रत्येक प्रभावशाली व्यक्तीला विशेष वागणूक दिली जाते, असा सरसकट निष्कर्ष काढता येणार नाही. मात्र, प्रशासनाच्या निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता नसेल आणि सामान्य माणसाला वारंवार पाठपुरावा करावा लागत असेल, तर पक्षपाताचा संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे.

डीजे व्यावसायिकांसमोर आज सर्वात मोठा प्रश्न आहे तो आर्थिक अनिश्चिततेचा. त्यांनी उपकरणे खरेदी करण्यासाठी गुंतवणूक केली आहे. वाहने, साउंड सिस्टीम, लाइटिंग, देखभाल, कामगारांचे मानधन आणि इतर खर्च त्यांना नियमितपणे करावे लागतात. कार्यक्रम मिळाले नाहीत, तर कर्जाचे हप्ते थांबत नाहीत; घरखर्च थांबत नाही; मुलांचे शिक्षण आणि कुटुंबाच्या गरजाही पुढे ढकलता येत नाहीत.

मोठ्या भांडवलाच्या व्यवसायाला काही काळ नुकसान सहन करण्याची क्षमता असू शकते. परंतु रोजच्या कमाईवर अवलंबून असलेल्या छोट्या व्यावसायिकासाठी काही दिवसांचा व्यवसायबंदही मोठा आर्थिक धक्का ठरू शकतो. त्यामुळे अशा व्यावसायिकांना केवळ नियमांची आठवण करून देऊन प्रश्न संपत नाही. नियमांचे पालन करून परवानगी मिळू शकते की नाही, कोणत्या अटी लागू होतील आणि निर्णय कोणत्या कालमर्यादेत घेतला जाईल, हे स्पष्ट सांगणे आवश्यक आहे.

पोलीस अधीक्षक तेगबीर संधू यांनी डीजे मालक-चालकांची बाजू सहानुभूतीपूर्वक ऐकून घेतल्याचे व्यावसायिकांकडून सांगितले जात आहे. ही सकारात्मक बाब असेल, तर आता त्याचे रूपांतर स्पष्ट आणि नियमाधारित निर्णयात होणे अपेक्षित आहे. केवळ सहानुभूतीने कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नाही; त्यासाठी रोजगाराच्या प्रश्नावर व्यवहार्य तोडगा आवश्यक असतो. नवरात्रोत्सवात शहराच्या विविध भागांत दांडिया कार्यक्रमांचे आयोजन होत आहे. या कार्यक्रमांमध्ये संगीत, साउंड सिस्टीम आणि रोषणाईचा वापर केला जातो. त्यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतोया कार्यक्रमांना ध्वनिवर्धक वापरण्याची परवानगी दिली जात असेल, तर ती कोणत्या अटींवर दिली जाते? डीजे सिस्टीमच्या वापराबाबत वेगळे नियम असतील, तर त्यांचे स्वरूप काय आहे? आणि सर्व संबंधित कार्यक्रमांवर नियमांची अंमलबजावणी एकाच निकषांनुसार होते आहे का? दांडिया कार्यक्रमांना परवानगी आहे म्हणजे डीजेलाही आपोआप परवानगी मिळाली पाहिजे, असा निष्कर्ष काढता येत नाही. कार्यक्रमाचे स्वरूप, ध्वनिक्षेपकांची क्षमता, ध्वनीपातळी, वेळ, ठिकाण आणि लागू असलेल्या नियमांनुसार परवानगीचे निकष वेगवेगळे असू शकतात. परंतु हे निकष स्पष्ट असले पाहिजेत आणि समान परिस्थितीत समान पद्धतीने लागू झाले पाहिजेत. जर दांडिया आयोजकांना कायदेशीर अटींच्या अधीन राहून साउंड सिस्टीम वापरण्याची परवानगी दिली जात असेल, तर डीजे व्यावसायिकांच्या अर्जांचाही त्याच पारदर्शकतेने विचार व्हायला हवा. परवानगी शक्य नसेल, तर त्यामागील कायदेशीर कारण स्पष्ट केले पाहिजे. परवानगी शक्य असेल, तर ध्वनीमर्यादा, वेळेची बंधने, उपकरणांची तपासणी आणि जबाबदारी निश्चित करून मार्ग काढता येईल का, याचा विचार केला पाहिजे.

# शिवरत्न जिवाजी महाले चौक व समाज मंदिराचा प्रश्न तातडीने सोडविणार : अक्षय गोरंट्याल

## नाभिक समाजाच्या मागणीला मनपा आयुक्त अंजली शर्मा यांचा सकारात्मक प्रतिसाद

**जालना - प्रतिनिधी**

शिवरत्न वीर जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त जालना शहरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त इंदिरानगर परिसरातील जागृतेश्वर मंदिरासमोर आयोजित कार्यक्रमात नाभिक समाजाच्या वतीने शहरात शिवरत्न वीर जिवाजी महाले यांचा चौक उभारावा तसेच नाभिक समाजासाठी समाज मंदिर अथवा सभागृह उपलब्ध करून द्यावे, अशी आग्रही मागणी करण्यात आली. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनी दोन्ही प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे केवळ आश्वासन देता तातडीने मनपा आयुक्ताची भेट घेऊन प्रश्न मांडला. ज्यास आयुक्तानी सकारात्मक प्रतिसाद दिला.



शिवरत्न वीर जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक अक्षय गोरंट्याल, कैकाडी समाजाचे जिल्हाध्यक्ष राजू पवार, व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष राजेश भालेराव तसेच सुमित वाघमारे यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवरत्न वीर जिवाजी महाले यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांना अभिवादन केले.

चौक आणि समाज मंदिराची मागणी

जालना शहरात नाभिक समाजाचे आराध्य दैवत व शौर्याचे प्रतीक असलेल्या शिवरत्न वीर जिवाजी महाले यांच्या नावाने चौक उभारण्यात यावा, अशी मागणी समाज बांधवांनी केली. तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि समाजोपयोगी उपक्रम राबविण्यासाठी नाभिक समाजाला स्वतंत्र समाज मंदिर किंवा सभागृह उपलब्ध करून द्यावे, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

समाजाच्या या मागण्या अनेकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असून, जिवाजी महाले यांच्या स्मृती जतन करण्याबरोबरच समाजाला एकत्र येण्यासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध होणे आवश्यक असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. नाभिक समाजाच्या मागणीची दखल घेत नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनी तत्काळ पुढाकार घेतला. या दोन्ही मागण्यांसंदर्भात त्यांनी जालना महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा यांच्याशी संपर्क साधून चर्चा केली. यावेळी आयुक्तांनी या मागण्यांबाबत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सांगण्यात आले. नगरसेवक गोरंट्याल यांच्या तत्परतेमुळे नाभिक समाजाच्या आशा उंचावल्या असून, चौक उभारणी आणि समाज मंदिराच्या मागणीबाबत पुढील कार्यवाहीकडे समाज बांधवांचे लक्ष लागले आहे. या दोन्ही मागण्या प्रत्यक्षात पूर्ण झाल्यास जालना शहरातील नाभिक समाजासाठी ती महत्त्वाची उपलब्धी ठरणार आहे.

या कार्यक्रमाला गौरव संत, विठ्ठल गिराम, दत्ता शेजुळकर, सुभाष काळे, सुरेश बोर्डे, वैजनाथ दळे, गणेश बोडखांब, शंकर सुराशे, ज्ञानेश्वर वखरे यांच्यासह नाभिक समाजातील अनेक बांधव उपस्थित होते.

शिवरत्न वीर जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त करण्यात आलेल्या या मागणीमुळे समाजाच्या विकासाशी संबंधित प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले असून, प्रशासनाच्या सकारात्मक प्रतिसादानंतर या मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# घरकुल अनुदाना अभावी लाभार्थी अडचणीत ; ८,६४७ घरकुले मंजूर; २,६८७ पूर्ण, तब्बल ५,९६० घरकुले प्रगतीपथावर

**सोयगाव - प्रतिनिधी**

तालुक्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना हक्काचे पक्के घर मिळावे, यासाठी शासनाच्या विविध घरकुल योजना राबविण्यात येत आहेत. मात्र, अनुदानाचे हप्ते वेळेवर मिळत नसल्याने अनेक लाभार्थ्यांच्या घरकुल बांधकामांना ब्रेक लागला आहे. तालुक्यात विविध योजनांमधून ८,६४७ घरकुले मंजूर झाली असताना आतापर्यंत २,६८७ घरकुले पूर्ण झाली आहेत. तब्बल ५,९६० घरकुलांची कामे अद्याप प्रगतीपथावर असल्याचेन आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत तालुक्यात ७,७०३ घरकुले मंजूर झाली आहेत. त्यापैकी २,३९६ घरकुले पूर्ण झाली असून ५,३०७ घरकुलांचे बांधकाम सुरू आहे. रमाई आवास योजनेत २२२ घरकुले मंजूर असून त्यापैकी केवळ ६ घरकुले पूर्ण झाली आहेत, तर २१६ घरकुलांची कामे सुरू आहेत. यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेत ५८३ घरकुले मंजूर झाली असून २२८ पूर्ण, तर ३५५ घरकुले प्रगतीपथावर आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजनेत १३९ घरकुले मंजूर झाली असून ५७घरकुले पूर्ण झाली आहेत. या योजनेतील ८२ घरकुलांची कामे सुरू आहेत. घरकुल बांधकामासाठी शासनाकडून योजनानिहाय अनुदान दिले जाते.

पान १ व ४ वरुन...

### दर आठवड्याच्या...

लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय अभिलेख कक्ष, स्वच्छतागृहे, पेंट्री, वाहनतळ आणि कार्यालयाच्या दर्शनी भागाची स्वच्छता करण्यावरही भर देण्यात येणार आहे. स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी कार्यालयातील विविध शाखांमध्ये माहितीफलक आणि घोषवाक्ये लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### सामाजिक उत्तरदायित्वाचा...

तसेच प्रदूषण नियंत्रण यंत्रणेला बायपास करून होणाऱ्या उत्सर्जनासारख्या बाबींवर बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, प्रदूषणाचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवता येणार नाही. उद्योग बंद करणे हा अंतिम उपाय नसून उद्योगांनी आपल्या नफ्यातील काही हिस्सा तंत्रज्ञानाच्या आधुनिकीकरणासाठी खर्च करणे आवश्यक आहे. जुन्या उत्पादन पद्धती आणि यंत्रणांमुळे या भागातील धूर प्रदूषणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. या उद्योगांची यापूर्वी प्रत्यक्ष पाहणी करून उद्योग प्रतिनिधींशी सविस्तर चर्चा करण्यात आली होती. त्यानंतर उद्योगांसमोर प्रदूषण नियंत्रणासाठी काही प्रमुख उपाययोजना ठेवण्यात आल्या. स्क्रॅपचे आकारमान कमी करून त्याचा नियंत्रित व सातत्यपूर्ण पुरवठा करण्याची यंत्रणा उभारणे, उत्पादन विभागातील अनावश्यक उघडी जागा बंद करणे, शेडमध्ये योग्य प्रेशर राखणे, धूरशोषणासाठी प्राथमिक व दुय्यम हूडची कार्यक्षमता वाढविणे आणि योग्य धूळ व वायुप्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारणे, या उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे.

तांत्रिक किंवा जागेच्या मर्यादांमुळे एखादी उपाययोजना शक्य नसल्यास उद्योगांनी तज्ज्ञ संस्थांकडून व्यवहार्य पर्याय निश्चित करून प्रदूषण नियंत्रण प्राधिकरणाची मान्यता घ्यावी, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली.

प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रत्येक उद्योगाची स्वतंत्र पाहणी व लेखापरीक्षण करावे. धूरगळती, नादुरुस्त यंत्रणा, प्रक्रिया शेडमधील उघड्या जागा, प्रदूषण नियंत्रण प्रणालीला वगळणारे मार्ग आणि धूळ नियंत्रणातील त्रुटी यांची उद्योगनिहाय नोंद करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा. या अहवालाच्या आधारे प्रत्येक उद्योगाला स्वतंत्र उपाययोजना आणि कालमर्यादा देण्यात येईल, असे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

मंडळाने दिलेल्या कालावधीत उद्योगांनी केलेल्या प्रत्यक्ष प्रयत्नांचा विचार पुढील निर्णय घेताना केला जाईल. कामात ठोस प्रगती दिसल्यास आवश्यकतेनुसार मुदतीबाबत विचार केला जाईल; मात्र कोणतीही प्रगती न करणाऱ्या उद्योगांना मुदतवाढ दिली जाणार नाही. अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण, पाण्याचे फवारे आणि वाहनांच्या चाकांमधून पसरणारी धूळ रोखण्यासाठी आवश्यक व्यवस्था तातडीने करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

उद्योगांनी केलेल्या उपाययोजना आणि प्रत्यक्ष प्रगतीचा आढावा घेण्यासाठी महिनाभरानंतर पुन्हा बैठक घेण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**सीएसआरचा निधी प्रदूषण नियंत्रणासाठी करा**

औद्योगिक संस्थांच्या सीएसआर निधीचा वापर प्रदूषण कमी करण्यासाठी करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. केवळ विविध कार्यक्रम, स्पर्धा किंवा इतर उपक्रमांवर निधी खर्च न करता, विद्यमान प्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यक यंत्रणा, पर्यावरणपूरक उपक्रम, जलसंधारण आणि परिसर सुधारणा यावर सीएसआरचा निधी वापरण्याचे आवाहन मुंडे यांनी केले.

औद्योगिक परिसरातील खराब रस्त्यांमुळे उडणारी धूळ कमी करण्यासाठी रस्ते सुधारणा, मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड, जलसंधारण, नदी-नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण, तसेच नागरिकांच्या आरोग्यासाठी श्वसनविषयक आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात यावीत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. प्रदुषण कमी करण्यासाठी काही उद्योगांनी आयआयटी मुंबई, आयआयटी दिल्ली आणि आयआयटी कानपूरमधील तज्ज्ञांशी चर्चा सुरू असल्याचे उद्योग प्रतिनिधींनी यावेळी सांगितले. काही उद्योगांमध्ये धूरशोषण यंत्रणेच्या क्षमतेत वाढ आणि दुय्यम हूडच्या आधुनिकीकरणाचे काम सुरू असून, काही कामे फेब्रुवारी-मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचेही सांगण्यात आले.

### आचारसंहिता संपल्यानंतर...

संपर्क साधत आहेत. फोन, वैयक्तिक संदेश तसेच सोशल मीडिया ग्रुपच्या माध्यमातून नागरिक आपल्या समस्या मांडत असल्याचे त्यांनी नमूद केले.

नागरिकांनी दाखविलेला विश्वास आणि सहकार्य महत्त्वाचे असून, त्यांनी मांडलेल्या समस्यांची दखल घेऊन नियमानुसार आणि प्रशासकीय प्रक्रियेनुसार आवश्यक पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासनही भुरेवाल यांनी दिले आहे.

२७ तारखेनंतर कामांना गती देण्यासाठी प्रयत्न

दिनांक २७ तारखेला आचारसंहिता संपल्यानंतर लागू नियम आणि प्रशासकीय प्रक्रियेनुसार प्रलंबित नागरी प्रश्नांचा पाठपुरावा करून आवश्यक कामांना गती देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे भुरेवाल यांनी आपल्या आवाहनात म्हटले आहे.

नागरिकांची समस्या ही आपलीही समस्या असून, जालना शहराचा विकास, स्वच्छता आणि नागरिकांचे आरोग्य या बाबींना आपण महत्त्व देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. केवळ आश्वासने देण्यापेक्षा प्रत्यक्ष कामावर भर देण्याची भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान, आचारसंहितेच्या काळात कोणती कामे करता येतात आणि कोणत्या कामांसाठी प्रशासकीय परवानगी किंवा पुढील कार्यवाही आवश्यक आहे, हे संबंधित नियमांनुसार ठरणार आहे. त्यामुळे नागरिकांनी संयम राखावा आणि सहकार्य करावे, असे आवाहन कपिल भुरेवाल यांनी केले आहे.

### दुष्काळी परिस्थितीच्या...

आणि अंबड शेतशिवारात जाऊन पिकांची पाहणी; नुकसानीची घेतली माहिती

केंद्रीय पथकाने बदनापूर तालुक्यातील नाणेगाव येथे शेतकरी शिवाजी डोंगरे यांच्या शेतातील करपलेले सोयाबीन पिकाची पाहणी केली. अंबड तालुक्यातील किणगाववाडी येथे शेतकरी उदल हरीचंद शिहिरे यांच्या शेतातील करपलेली मोसंबीची झाडे आणि कोरडे पडलेले शेततळे यांची स्थिती पाहिली. याच परिसरातील शिवलाल गांगे यांच्या शेतातील अदरक पिकाची, तर बालचंद गांगे यांच्या शेतातील कापूस पिकाची पाहणी करण्यात आली.

जामखेड येथे शेतकरी संतोष गुरुके यांच्या शेतातील बाजरी पिकाची, तसेच गणेश जुंजार यांच्या शेतातील कोरड्या विहिरीची पाहणी करून पाण्याच्या उपलब्धतेअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीची माहिती घेण्यात आली. याशिवाय अंबड तालुक्यातील कोरड्या पडलेल्या गल्हाटी मध्यम प्रकल्पाची पाहणी केली. या प्रकल्पावर अवलंबून असलेल्या गावांच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न, सिंचनासाठी घटलेली पाण्याची उपलब्धता आणि मच्छीमारीवर उपजीविका करणाऱ्या १०६ कुटुंबाच्या समस्यांची माहिती पथकाने घेतली.तसेच प्रकल्प परिसरातील उत्तमराव साळुंके यांच्या शेतातील कापूस तसेच अन्य शेतांमधील ऊस पिकांचीही पाहणी करून पिकांच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. नाणेगाव, किणगाववाडी आणि जामखेड परिसरातील विविध पिकांची पाहणी करताना केंद्रीय पथकाने पिकांची वाढ, पावसाअभावी झालेली हानी आणि संभाव्य उत्पादनावर होणाऱ्या परिणामांची प्रत्यक्ष माहिती घेतली.

खरीप हंगामातील पिकांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी पथकाने संबंधित शेतकऱ्यांशी संवाद साधला. पर्जन्यमान, पावसातील खंड, उपलब्ध पाण्याची स्थिती आणि त्याचा पिकांच्या वाढीवर झालेला परिणाम याबाबत शेतकऱ्यांकडून सविस्तर माहिती जाणून घेण्यात आली.

यावेळी शेतकऱ्यांनी पिकांचे झालेले नुकसान, वाढता उत्पादन खर्च आणि सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता यांसंदर्भातील अडचणी पथकासमोर मांडल्या. प्रतिकूल हवामान आणि पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतीसमोर निर्माण झालेल्या आव्हानांची जाणीव करून देत शेतकऱ्यांनी आपल्या परिस्थितीची माहिती दिली.

कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी केंद्रीय पथकाला जिल्ह्यातील पर्जन्यमान, पीक परिस्थिती आणि दुष्काळसदृश स्थितीबाबत सविस्तर माहिती दिली. प्रत्यक्ष शेतशिवारातील पाहणी, पिकांची स्थिती आणि शेतकऱ्यांशी झालेल्या संवादाच्या आधारे केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथक शासनाला परिस्थितीचा अहवाल सादर करणार आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून तातडीने मदत मिळावी, अशी अपेक्षा यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केली. पीक नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून नुकसानभरपाई, आवश्यक आर्थिक मदत आणि पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणीही शेतकऱ्यांनी केंद्रीय पथकाकडे केली.

### सैन्यदलातील अधिकारी...

उत्तीर्ण होऊन एसएसबी मुलाखतीसाठी पात्र ठरलेले उमेदवार. एनसीसी स्पेशल एन्ट्रीः एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर प्राप्त झालेले उमेदवार. टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्सः एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर असलेले उमेदवार. युनिव्हर्सिटी एन्ट्री स्कीमः एसएसबी कॉल लेटर असलेले किंवा एसएसबीसाठी शिफारस केलेल्या यादीत नाव असलेले उमेदवार. पात्र उमेदवारांनी मुलाखतीच्या वेळी संबंधित पात्रतेची प्रमाणपत्रे व आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. प्रशिक्षणाबाबत अधिक माहितीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथील प्रभारी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. ई-मेल : ... दूरध्वनी क्रमांक ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सॲप क्रमांक ९१५६०७३३०६. भारतीय सैन्यदलात अधिकारी म्हणून करिअर घडवू इच्छिणाऱ्या पात्र युवकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### निवडणूक तयारीत...

व उमेदवारांच्या निवडणूक खर्चासाठी लेखा कक्ष स्थापन करावेत. निवडणूक साहित्याची मागणी समन्वय कक्षामार्फत नोंदवावी. निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांची अंतिम यादी १६ ऑक्टोबरपर्यंत तयार करून टपाली मतदानासाठी आवश्यक पाकिटांची उपलब्धता सुनिश्चित करावी.

टपाली मतपत्रिकांची छपाई व वाटपाचे नियोजन वेळेत पूर्ण करावे. नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर, बीड व जालना जिल्ह्यांनी मतदान केंद्रांच्या संख्येनुसार वाहनांचे सूक्ष्म नियोजन करावे. मतदान व मतमोजणीसाठी आवश्यक वाहने सुस्थितीत ठेवून पर्यायी वाहनांची व्यवस्था तयार ठेवावी.

मतमोजणीसाठी उपजिल्हाधिकारी व तहसीलदार दर्जाच्या सुमारे ३०० अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असून, निवडणूक कालावधीत त्यांना रजा देऊ नये. १५ ऑक्टोबर रोजी मतदान साहित्य, मतपेट्या, वाहतूक व सुरक्षा व्यवस्थेचा पुन्हा आढावा घेण्यात येणार आहे. सर्व जिल्ह्यांनी पोलीस प्रशासनाशी समन्वय ठेवून कायदा व सुव्यवस्थेचे काटेकोर नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. मतदान केंद्रांची संख्या, मनुष्यबळ, वाहतूक, सुरक्षा, प्रशिक्षण, मतदान साहित्य, टपाली मतदान व मतमोजणीच्या तयारीबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. विविध जिल्ह्यांतील निवडणूक तयारीतील त्रुटी तातडीने दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त

अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची आज पुण्यतिथी. गुरुदत्तजींच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा विशेष लेख. गुरुदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्मक चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फूल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्मकता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत. आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा.... आरपार मधील बाबूजी धीरे चलना..... सी आय डी मधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फूल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली. केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो. ९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली. देव आनंद यांच्या बाजी आणि जाल या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले तर गुरुदत्त यांनी निर्माण केलेल्या सी आय डी या चित्रपटात देव आनंद हे नायक होते .



गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. बाजी या चित्रपटाच्या सेटवर गुरुदत्त यांची गीता रॉय या बंगाली अभिनेत्रीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांना तीन मुलेही झाली पण दोघांचे एकमेकांशी पटले नाही दोघात किरकोळ कारणांमुळे वाद होऊ लागला. दररोज होणारा वाद टाळण्यासाठी गीता रॉय मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या, वेगळ्या राहू लागल्या याच दरम्यान गुरुदत्त हे वहिदा रहेमान यांच्या जवळ गेल्याचे बोलले गेले मात्र वहिदाजींना आपले करियर करायचे असल्याने त्या या नात्यात अडकल्या नाहीत. या सर्व कारणांनी गुरुदत्त कमालीच्या डिप्रेशनमध्ये गेले आणि तो काळा दिवस उजाडला. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाचा भरात झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळवली.

अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांच्या निधनानंतर प्रख्यात शायर कैफी आझमी यांनी लिहिलंय

रहनेको सदा दहरमे आता नही कोई
तुम जैसे गये वैसे जाता नहीं कोई
एक बार तो मौत भी घबरा गई होगी
यू मौत को सिने से लगाता नहीं कोई

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

---

# 'गणेशभक्त नाना'

## थोर कलाकर, एक मनस्वी व्यक्तिमत्व लाभलेले

नाना पाटेकर यांचे प्रत्यक्षातील जीवन जसे नेहमीच धक्कादायक राहिले तशीच त्यांची कालची एक्झिट देखील खूपच धक्कादायक ठरली. त्यांच्या पार्थिवावर झालेले अंत्यसंस्कार दूरचित्रवाणीवर पाहून देखील अजून ते गेले, हे मानायला मन तयार नाहिये.



नाना गेल्याचे वृत्त समजल्यापासून त्यांच्याबद्दल जे जे लिहून येत आहे, ते ते मी वाचत आहे. दूरचित्रवाणी वाहिन्यांवर आणि समाज माध्यमांवर जे जे दाखविण्यात येत आहे, ते ही मी पहात आहे. पण नानाच्या एका मुद्द्याचा कुठेच उल्लेख झाल्याचे दिसून आले नाही, म्हणुन माझा हा लेखन प्रपंच आहे.

मी मुंबई दूरदर्शन केंद्रात मी १९८६ ते १९९१ अशी पावणे सहा वर्षे कार्यक्रम निर्मिती विभागात सेवा केली. या दरम्यान तीनचार वर्षे मी मुंबईतील गणेशोत्सवावर आधारित दूरदर्शन वृत्तांताच्या निर्मितीत सहभागी असायचो. गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवसापासून आम्ही चित्रीकरण सुरू करीत असू. विशेष म्हणजे एखादा परिपाठ असल्याप्रमाणे हे चित्रीकरण आम्ही नाना तेव्हा रहात असे ,त्या त्याच्या माहीम ( पश्चिम ) बाजूला, एकदम रस्त्याला लागून असलेल्या नव सहयोग सोसायटीच्या तळ मजल्यावर असलेल्या घरापासून सुरू करायचो. नाना स्वतः कलाकर असल्याने, त्यात तो मूळचा रायगड जिल्ह्यातील मुरुड येथील असल्याने आणि बहुतेक कोकणी लोक जसे पराकोटीचे गणेश भक्त असतात, त्या प्रमाणे नानाही असल्याने घरच्या गणपतीची आरास आणि मुख्य म्हणजे फुलांची सुंदर सजावट स्वतःच्या हाताने, अतिशय मन लावून करायचा. काही वेळा आम्ही पोहोचलेलो असलो तरी, त्याची सजावट करणे सुरूच असायचे.त्यामुळे आम्हाला आपसूकच लाईव्ह शॉट्स मिळायचे. नंतर आरती करून, नाश्तापाणी घेऊन आम्ही पुढील इतर मोठमोठ्या गणेश मंडळांच्या गणपतीचे, तेथील सजावटीचे, ऊत्सवाचे चित्रिकरण करून रात्री बारा एकच्या सुमारास दूरदर्शन केंद्रात परत येत असू. अर्थात ज्यांना शक्य असे ते दादर स्टेशनलाच उतरत असत. त्यावेळी दूरदर्शन ही एकमेव दूरचित्रवाणी वाहिनी असल्याने प्रत्येक ठिकाणी आमचे आगतस्वागत जोरदार होत असे.

असो. पुढे मी दूरदर्शन सोडून महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनायात रुजू झालो. त्यामुळे नानाच्या घरी जाण्याचा किंवा इतर काही कारणाने समक्ष भेटण्याचा योग आला नाही.

गणेशभक्त नानाला विनम्र अभिवादन.

**लेखन: देवेंद्र भुजबळ**
**निवृत्त माहिती संचालक**
**मुंबई.**
**-९८६९४ ८४८००**

---

# 'कोण होणार करोडपती' चा भव्य शुभारंभ; अभिनेत्री माधुरी दीक्षित आणि सोनाली बेंद्रे मंचावर एकत्र झळकणार

सोमवार, १२ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता सोनी मराठी आणि सोनी लिव्हवर बॉलिवूडमधील दोन लोकप्रिय आणि दिग्गज अभिनेत्री, पहिल्यांदाच एकत्र आलेली ही जोडी; मनमोकळ्या गप्पा, जुन्या आठवणी आणि काही अनपेक्षित खुलाशांनी रंगणार आहे एक खास संध्याकाळ! सोनी मराठीवरील 'कोण होणार करोडपती' या लोकप्रिय कार्यक्रमाच्या नव्या पर्वाची सुरुवात येत्या सोमवार, १२ ऑक्टोबरपासून होणार आहे. यंदा माधुरी दीक्षित सूत्रसंचालकाच्या भूमिकेत असून, कार्यक्रमाच्या भव्य शुभारंभाच्या विशेष भागात सोनाली बेंद्रे हॉटसीटवर विराजमान होणार आहे. 'आता खेळ बदलणार' या घोषवाक्याला साजेसा हा विशेष भाग मराठी मनोरंजनविश्वात नव्या पर्वाची नांदी ठरणार आहे. आपापल्या चित्रपट कारकिर्दीत अनेक यशस्वी भूमिका साकारून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या माधुरी दीक्षित आणि सोनाली बेंद्रे यांनी आजवर एकाही चित्रपटात एकत्र काम केलेले नाही. त्यामुळे सोनी मराठीच्या मंचावर पहिल्यांदाच एकत्र दिसणाऱ्या या दोन लोकप्रिय अभिनेत्रींची जोडी प्रेक्षकांसाठी खास पर्वणी ठरणार आहे. प्रेक्षकांना बॉलिवूडच्या जुन्या आठवणी, खुसखुशीत गप्पा आणि 'कोण होणार करोडपती'च्या खेळातील उत्कंठा यांचा सुंदर मिलाफ या भागात पाहायला मिळणार आहे. यानिमित्तानं या दोन लाडक्या अभिनेत्रींच्या व्यक्तिमत्त्वाचं आणि त्यांच्या आयुष्यातील काही खास पैलूंचं दर्शन प्रेक्षकांना घडेल.



प्राण्यांप्रती असलेल्या प्रेमामुळे सोनाली बेंद्रे या विशेष भागात हॅपी पेट फाउंडेशन या संस्थेला पाठिंबा देण्यासाठी खेळत असून या भागात ती प्राणी कल्याणासाठी करत असलेल्या कामाबद्दल तसेच तिच्या 'हॅपी पॉडकास्ट' या उपक्रमाबद्दलही मनमोकळेपणानं बोलणार आहे. माधुरी आणि सोनाली यांच्यात घर सांभाळण्याच्या जबाबदाऱ्यांवरही रंगतदार चर्चा घडताना दिसेल. याच गप्पांमध्ये सोनालीनं आपल्या सासूबाईंबद्दल एक खास गोष्ट सांगितली. तिच्या सासूबाई तिला स्वयंपाकघरात कधीच काम करू देत नाहीत, असा गोड खुलासाही तिने या वेळी केला आणि घरातील कामांचे योग्य नियोजन, जबाबदाऱ्यांची विभागणी आणि एकमेकांना सहकार्य करणे या गोष्टींमुळे घर सुरळीत चालण्यास मदत होते, यावर दोघींचे एकमत झालं. या कार्यक्रमात आपल्या भावना व्यक्त करताना माधुरी दीक्षित म्हणाली, ''सोनाली आणि मी आजवर एकाही चित्रपटात एकत्र काम केलेले नाही. पण अजूनही उशीर झालेला नाही! आज अखेर आपण 'कोण होणार करोडपती'च्या मंचावर एकत्र आलो आहोत. हा खरोखरच खूप आनंदाचा क्षण आहे आणि या नव्या प्रवासाची सुरुवात तुझ्यासोबत होत असल्याचा मला खूप आनंद आहे. तुझ्यासोबत एकाच मंचावर येणे माझ्यासाठी खूप खास आहे. माझ्यासाठी हा एक सोहळाच आहे.'' माधुरी दीक्षितचे सूत्रसंचालक म्हणून स्वागत करताना सोनाली बेंद्रे म्हणाली,'''कोण होणार करोडपती'ला आता महिला सूत्रसंचालक लाभली आहे.

आणि माधुरीपेक्षा यासाठी उत्तम पर्याय कोण असू शकतो? मी नेहमीच माधुरी दीक्षितची चाहती राहिले आहे; पण आता या निमित्ताने मला तिला आणखी जवळून जाणून घेण्याची संधी मिळते आहे. तिचा धाकटा मुलगा आणि माझा मुलगा एकाच शाळेत शिकतात, त्यामुळे आमच्या भेटी होत असतात. मात्र, एकाच मंचावर येण्याचा योग आजवर आला नव्हता. या मंचावरील आपला अनुभव सांगताना सोनाली म्हणते, ''माधुरी सूत्रसंचालक म्हणून उत्तम काम करेल, याचं मला अजिबात आश्चर्य वाटत नाही. कारण ती अतिशय प्रेमळ आणि आपुलकीनं वागणारी व्यक्ती आहे. तिच्यातील हा प्रेमळपणा मी अनुभवला असल्यामुळे ती एक उत्तम सूत्रसंचालक ठरेल, याची मला खात्री होती. ती एक अप्रतिम अभिनेत्री आहे, यात काहीच शंका नाही. तिच्या नृत्याची मी नेहमीच चाहती राहिले आहे.

आणि इथे या मंचावर तिचे नृत्य पाहण्याची संधीही मला मिळाली. तो माझ्यासाठी खूपच सुंदर अनुभव होता. त्यामुळे आमच्यापैकी कोणाला काही सांगायचे असेल, तर कृपया आम्हा दोघींसाठी काहीतरी लिहा. मला ते नक्कीच आवडेल!'' पहिल्यांदाच एकत्र आलेली माधुरी आणि सोनाली यांची जोडी, त्यांच्या आयुष्यातील खास किस्से, मनमोकळ्या गप्पा आणि एका महत्त्वपूर्ण सामाजिक कार्याला दिलेला पाठिंबा यांमुळे 'कोण होणार करोडपती'चा हा भव्य शुभारंभाचा हा भाग प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची खास मेजवानी ठरणार आहे. 'कोण होणार करोडपती'चा भव्य शुभारंभ पाहायला विसरू नका! सोमवार, १२ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता फक्त सोनी मराठी आणि सोनी लिव्हवर.

---

# देशाचे क्रांतिवीर नटसम्राट व युवकांना नवी दिशा देणारे महान युगपुरुष;नाना पाटेकर

दिनांक ८ ऑक्टोबर २०२६ ला अचानक नाना पाटेकर यांची प्राणज्योत मावळली व नाना नावाचं वादळ एकाएकी शांत झाले.यामुळे सर्वत्र शोककळा पसरली.नाना पाटेकर यांचे कार्य ना भुतो ना भविष्यती अशाप्रकारचे आहे.कारण त्यांच्या प्रत्येक चित्रपटातुन कुठे क्रांतीची ज्योत, शिक्षणाचा प्रवाह, सर्वसामान्यांच्या समस्या, अत्याचार व भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा धगधगतांना दिसत होता.त्यांची चित्रपटसृष्टीत काम करण्याची शैली आगळीवेगळी होती त्यामुळे त्यांचा स्वभाव शांत जरी असला तरी त्यांची कार्यशैली आक्रमक स्वरूपाची होती.कारण त्यांच्या चित्रपटातील डॉयलॉग,हावभाव अविस्मरणीय होत्या. त्यामुळे प्रेक्षकांचे मन ताबडतोब जिंकण्याची क्षमता त्यांच्यात अफाट असल्याने महाराष्ट्रासह संपूर्ण देश त्यांच्यावर प्रेम करायचा त्यामुळे त्यांचे आतापर्यंतचे संपूर्ण कार्य वाखाणण्याजोगे आहेत.नाना पाटेकर देशाचे सुप्रसिद्ध अभिनेता व नटसम्राट होते खरे परंतु त्यांचे रहाणीमान अत्यंत साध्यापणाचे होते त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा गर्व किंवा घमंड किंवा द्वेषभावना असा कोणताही प्रकार त्यांच्यात नव्हता.त्याच्या प्रत्येक चित्रपटातुन देशभक्तीची ज्वाला, आपुलकी भावना,समानतेची जोत व एकतेचे प्रतीक संपूर्ण देशभर हवेसारखे पसरले होते.त्यामुळे आज त्यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकाकुल झाला आहे.त्यांचा सर्वात जास्त भर सामाजिक संस्थांना भेट देऊन त्यांना आर्थिक मदत करून समाज कार्य करायचे व त्यांच्या अडीअडचणी जाणून घेणे आणि गोरगरीबांची सेवा करणे हा होता. नानाजी राजकारणापासुन कोसो दूर राहून समाज कार्य करायचे. समाजकार्याच्या माध्यमातून त्यांनी राज्यासह देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना मन जिंकले व आपलेसे केले.त्यामुळे देशातील प्रत्येक राजकीय पुढारी नाना पाटेकरांचा मानसन्मान करायचे. त्याचप्रमाणे नेहमीच गावखेडे,सामाजिक संस्था, अतिदुर्गम भाग अशा ठिकाणी नेहमीच भेट देऊन देश सेवा करीत असल्याने महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला आपलेसे करून घेतले होते.मिडियाच्या माध्यमातून त्यांनी राज्यासह देशवासीयांशी अनेकदा संवाद सुध्दा साधला व देशवासीयांना आपलसं करून घेतले.कारण त्यांचे मार्गदर्शन नेहमीच समाज हिताचे व देश हिताचे रहाचे.परंतू सुप्रसिद्ध अभिनेता नाना पाटेकर अचानक आपल्यातून गेल्याने सर्वांना मार्गदर्शन करणारा आणि



शिकवण देणारा नटसम्राट आज पडद्याआड गेला व संपूर्ण देश शोकाकुल झाला आहे.

कारण त्यांच्या प्रत्येक शब्दात अम्रृतवाणी,सत्यता आणि बांधिलकी होती.कुठे कोणाला कसे ट्रीक करायचे ही सटीक कला आणि शैली त्यांना चांगलीच अवगत होती.नाना पाटेकरांनी आपल्या धारदार शैलीतून अनेक ज्वलंत प्रश्नांना व शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सडेतोडपणे मिडिया समोर मांडून आणि सरकार व प्रशासनाशी संवाद साधून सोडविले सुध्दा आहेत. कारण त्यांच्या कार्यशैलीचा मुख्य उद्देश होता की,''बाप दाखव नाही तर श्राद्ध कर''अशा पध्दतीने अनेक प्रश्न सडेतोडपणे मांडून समाज जागृती व सरकारला जागे करण्याचे ते नेहमीच काम करायचे आणि त्यांचे ध्येय एकच होते ते म्हणजे खरेपणा यामुळेच ते चित्रपटसृष्टीत व सामाजिक क्षेत्रात एवढा मोठा शिखर गाठू शकेल. महत्वाचे म्हणजे फिल्मफेअरच्या इतिहासात सर्वोत्कृष्ट अभिनेता, सहाय्यक अभिनेता आणि खलनायक अशा तीनही महत्त्वाच्या श्रेणीमध्ये पुरस्कार जिंकणारे ते एकमेव अभिनेता होते;तर मराठीत नटसम्राट चित्रपटांतील त्यांच्या अजरामर भूमिकेसाठी त्यांना फिल्मफेअर मराठीचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला आहे.परंतु नाना नावाचं वादळ अचानक शांत झाल्याने संपूर्ण चित्रपटसृष्टीचा अभिनय,संवेदनशीलतेचा भारदस्त चेहरा आणि सामाजिक बांधिलकीची भिंत कोसळल्याने महाराष्ट्रासह संपूर्ण देश आज दुःखच्या छायेत दिसून येतो.स्वर्गीय नटसम्राट जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली व यांच्या आत्म्याला शांती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

---

# दुष्काळी पाहणी दौऱ्यात विजय वडेट्टीवारांनी घेतली आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची भेट

## पिरपिंपळगाव येथे रात्री १० वाजता सांत्वन; जिल्हा काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून २५ हजारांची आर्थिक मदत

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेले काँग्रेसचे विधिमंडळ नेते तथा माजी मंत्री आमदार विजय वडेट्टीवार यांनी पिरपिंपळगाव येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. रात्री १० वाजता त्यांनी स्वर्गीय विष्णू तुळशीराम कोल्हे यांच्या कुटुंबीयांची भेट घेत दुःखाच्या प्रसंगी त्यांना धीर दिला. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून कुटुंबाला २५ हजार रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली. जालना जिल्ह्यात यंदा अपुऱ्या पावसामुळे आणि पावसातील दीर्घ खंडामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या परिस्थितीचा शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर गंभीर परिणाम होत असून, अनेक शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करीत आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार विजय वडेट्टीवार यांच्या दुष्काळी पाहणी दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दुष्काळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची प्रत्यक्ष माहिती घेण्यासोबतच संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांशी संवाद साधण्यावरही या दौऱ्यात भर देण्यात आला. पिरपिंपळगाव येथे पोहोचल्यानंतर आमदार वडेट्टीवार यांनी स्वर्गीय विष्णू तुळशीराम कोल्हे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांच्या दुःखात सहभागी असल्याची भावना व्यक्त केली. शेतकरी कुटुंबावर ओढवलेल्या या संकटाच्या काळात त्यांना आधार देण्याच्या उद्देशाने जिल्हा काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून २५ हजार रुपयांची रोख मदत देण्यात आली. यावेळी आमदार वडेट्टीवार यांनी शेतकऱ्यांनी नैराश्यातून कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये, असे कळकळीचे आवाहन केले. संकट कितीही मोठे असले तरी निराश न होता कुटुंबीय, मित्रपरिवार आणि समाजातील व्यक्तींशी संवाद साधावा, असे आवाहन त्यांनी केले. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना आधार देणे आणि त्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधणे आवश्यक असल्याची भावना या भेटीतून व्यक्त झाली. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असताना त्यांना वेळेत मदत मिळणे, पिकांच्या नुकसानीची योग्य दखल घेतली जाणे आणि शेतकरी कुटुंबांना आवश्यक आधार उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे. अशा परिस्थितीत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला भेट देऊन सांत्वन करणे आणि आर्थिक मदत देणे हा या दौऱ्याचा संवेदनशील भाग ठरला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना व्हाव्यात, संकटग्रस्त कुटुंबांना दिलासा मिळावा आणि दुष्काळाच्या परिणामांना सामोरे जाण्यासाठी प्रभावी मदत उपलब्ध व्हावी, अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त होत आहे. या भेटीदरम्यान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष बदरभाई चाऊस, जिल्हा सरचिटणीस शांतीलाल बनसोडे, तालुकाध्यक्ष कृष्णा पडुळ, किसान काँग्रेसचे अध्यक्ष वाडेकर, जिल्हा समितीचे मार्गदर्शक राजाभाऊ कुलकर्णी, उपाध्यक्ष सुभाष कोळकर, ज्येष्ठ नेते अशोक उबाळे यांच्यासह काँग्रेसचे अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी संवाद योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांचा क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद

## गावपातळीवर पाणी, चारा, रोजगार आणि शेतकरी मदतीचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या शेतकरी संवाद योजनेचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी आज व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी संवाद साधला. या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, कृषी सहायक आदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांपर्यंत प्रत्यक्ष मदत पोहोचविण्यावर भर यंदा पर्जन्यमान कमी राहिल्याने शेतकरी आणि पशुपालकांसमोरील अडचणी वाढल्या आहेत, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. प्रत्येक गावातील गरजू शेतकरी कुटुंबांची ओळख पटवून त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, हा शेतकरी संवाद योजनेचा मुख्य उद्देश आहे. गावपातळीवरील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या घरी व शेतात प्रत्यक्ष जाऊन त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात, असेही त्यांनी निर्देशित केले.

पाणी नियोजन आणि अवैध उपसा जिल्ह्यातील मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये पाणीसाठा अत्यल्प आहे. एकूण ६७ प्रकल्पांच्या २४७.१६ दलघमी क्षमतेपैकी केवळ २३.९४ दलघमी (९.७%) साठा उपलब्ध असून ४७ प्रकल्प रिकामे आहेत. ७ मध्यम प्रकल्पांमध्ये ६५.७९ दलघमी क्षमतेपैकी ९.९४ दलघमी (१५.१%) साठा आहे, तर ६० लघु प्रकल्पांमध्ये १८१.३७ दलघमी क्षमतेपैकी १४.०० दलघमी (७.७%) साठा आहे. या पार्श्वभूमीवर: पाणी कपातीबाबत तातडीने परिपत्रक काढावे. अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी बेकायदेशीर वीज जोडण्या तोडण्याची कारवाई तीव्र करावी. कोविड काळात ऑक्सिजन राखीव ठेवल्याप्रमाणे पिण्याच्या पाण्याचे स्रोत राखीव ठेवावेत. गावनिहाय पाणी स्रोत किती काळ पुरतील आणि कोणत्या टप्प्यावर टंचाई जाणवेल, याचे नियोजन करावे.

विहीर अधिग्रहणाचे प्रस्ताव गतीने मार्गी लावावेत; प्राधान्याने २५० गावांचे प्रस्ताव घ्यावेत. जलसंधारण आणि पुनर्भरण जुन्या विहिरींतील गाळ काढणे, स्वच्छता व पुनर्भरण करावे.

पूर्वीच्या दुष्काळात उपयोगी ठरलेल्या चांगल्या पाणी स्रोतांचा वापर करावा. वन्यप्राण्यांसाठी जंगलात पाणवठ्यांची व्यवस्था करावी. पाणी बचतीबाबत गावोगावी जनजागृती करावी. रोजगार आणि मजुरी



विकसित भारत-जी राम जी ( - ) योजनेअंतर्गत गावातच कामे उपलब्ध करून द्यावीत. या योजनेतून गावातच मिळणाऱ्या रोजगाराच्या संधींची माहिती गावकऱ्यांपर्यंत पोहोचवावी. यासाठी ग्राम रोजगार सेवकांना सक्रिय करावे. सोयाबीन काढणीसाठी जमीनधारकांना मजुरांची गरज असल्याने, मजुरांना काम आणि चारा असा दुहेरी फायदा मिळेल, याचा विचार करावा. चारा आणि पशुधन जनावरांसाठी चारा जतन करणे हा महत्त्वाचा प्रश्न असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. चारा बंदी आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी.

कमी पर्जन्यमान असलेल्या भागात ऊस चारा म्हणून राखीव ठेवणे शक्य आहे का, याचा आढावा घ्यावा. हायड्रोपोनिक्स पद्धतीने चारा निर्मितीचा प्रयोग करण्याबाबत विचार करावा. शेतकरी सहाय्य आणि प्रशासकीय कामे डिजिटल क्रॉप सर्व्हेचे काम तातडीने पूर्ण करावे. नुकसानीचे पंचनामे वेळेत पूर्ण करावेत. शेतकऱ्यांचे समुपदेशन करावे आणि अडचणीतील कुटुंबांशी सतत संवाद ठेवावा. गरजू कुटुंबे दत्तक घेण्याच्या उपक्रमात अधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवी संस्थांनी सहभागी व्हावे. महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्रे वितरित करावीत. रब्बी हंगामाचे नियोजन करून कोणती पिके घेता येतील, याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. सामूहिक विवाह सोहळ्यांसाठी नोंदणी व जनजागृती करावी. महिला व आरोग्य यंत्रणेचा सहभाग शेतकरी महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी आशा आणि अंगणवाडी सेविकांना सहभागी करून घ्यावे, असे निर्देश देण्यात आले. पुढील कार्यवाही पुढील एका आठवड्यात गावोगावी सभा घेऊन या सर्व उपाययोजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. शेतकऱ्यांशी सातत्याने संवाद ठेवून त्यांच्या अडचणींचे तत्काळ निराकरण करावे, असेही त्या म्हणाल्या.

# वन्यजीव सप्ताहात वन अधिकारी-कर्मचाऱ्यांचे उत्स्फूर्त रक्तदान

## सेवा संकल्प अभियानांतर्गत जालना येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

सेवा संकल्प अभियानांतर्गत वन्यजीव सप्ताहाचे औचित्य साधून वन अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्रादेशिक वन विभाग, सामाजिक वनीकरण, वन प्रशिक्षण संस्था आणि वन संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच रोटरी क्लब व जनकल्याण रक्तपेढी, जालना यांच्या सहकार्याने वन प्रशिक्षण संस्था, जालना येथे हे शिबिर



घेण्यात आले.

या रक्तदान शिबिरास वन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले.

सामाजिक बांधिलकी जपत गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमातून वन विभागाने जनसेवेचा आदर्श निर्माण केला.

# वाटूर फाटा येथे शूरवीर जिवा महाले यांची जयंती उत्साहात साजरी

**परतूर - प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे निष्ठावंत शूरवीर योद्धे जिवा महाले यांची जयंती वाटूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. वाटूर येथील नाभिक समाज, शूरवीर जिवबा सामाजिक प्रतिष्ठान आणि आधार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमादरम्यान शूरवीर जिवा महाले यांच्या शौर्य, पराक्रम, निष्ठा आणि स्वराज्याप्रती असलेल्या समर्पणावर प्रकाश टाकणारी भाषणे झाली. प्रतापगडाच्या ऐतिहासिक लढाईत छत्रपती शिवाजी महाराजांच्या रक्षणासाठी जिवा महाले यांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचे स्मरण करून देण्यात आले. त्यांच्या शौर्याचा आणि त्यागाचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

जिवा महाले यांचा इतिहास गावोगावी पोहोचविणार

शूरवीर जिवबा सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने जिवा महाले यांच्या ऐतिहासिक कार्याची माहिती गावोगावी पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्यांच्या शौर्यगाथेतून तरुण पिढीला प्रेरणा मिळावी, ऐतिहासिक वारशाची जपणूक व्हावी आणि समाजात महापुरुषांच्या कार्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

या कार्यक्रमाला वाटूर येथील नाभिक समाज बांधवांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी वीरेंद्र केशरखाने, एकनाथ राऊत, शंकर किटाळे, बाळासाहेब सातपुते, प्रकाश मोरे, गणेश राऊत, नागनाथ राऊत, दगडुबा कोकाटे, वसंत धाईस्कर, गणेश यादव, रामेश्वर राऊत, मोहसिन पठाण, अशोक धाईस्कर, गोविंद प्रधान, राजेश राऊत, भगवान काळे, अर्जुन कोकाटे यांच्यासह नाभिक समाज बांधव उपस्थित होते.

शूरवीर जिवा महाले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पराक्रमाचे स्मरण करून त्यांच्या इतिहासाचा प्रसार करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

## सैन्यदलातील अधिकारी पदासाठी इच्छुक युवकांना मोफत पूर्वप्रशिक्षणाची संधी

# नाशिक येथील प्रशिक्षण केंद्रात १९ ते २८ ऑक्टोबरदरम्यान एसएसबी अभ्यासक्रम; जालना जिल्ह्यातील उमेदवारांसाठी १५ ऑक्टोबरला मुलाखत

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्याची इच्छा असलेल्या युवकांसाठी मोफत पूर्वप्रशिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. सेवा निवड मंडळाच्या () परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे १९ ते २८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत एसएसबी अभ्यासक्रम आयोजित करण्यात आला आहे. या प्रशिक्षणासाठी पात्र उमेदवारांना मोफत प्रशिक्षणासह निवास व भोजनाची सुविधाही देण्यात येणार आहे.

निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी केंद्रामध्ये पोहचण्यासाठी दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रात हजर रहावे. जालना जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांची निवड करण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना यांनी केले आहे.

**पात्र उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे.**

मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी , () यांच्या .... या संकेतस्थळावरील मधील ' ६७' या विभागातून प्रवेशपत्र डाउनलोड करावे. संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून प्रवेशपत्राची प्रत मिळाल्यास तीही सोबत आणावी. प्रवेशपत्रासोबत नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे पूर्ण करून मुलाखतीच्या वेळी सादर करावीत.

या प्रशिक्षणासाठी पुढीलपैकी संबंधित पात्रता असणे आवश्यक आहे.

- किंवा - परीक्षा उत्तीर्ण: कंबाइंड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (-) अथवा नॅशनल डिफेन्स अकॅडमी (-) परीक्षा (पान २ वर)

# जे ई एस महाविद्यालयात महात्मा गांधी जयंती



**जालना - प्रतिनिधी**

: जे ई एस महाविद्यालयात महात्मा गांधी व माजी प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली.यावेळी उपप्राचार्य डॉ.उमेश मोगले,डॉ.महावीर सदावर्ते, डॉ.नानासाहेब गोरे,डॉ राजेंद्र सोनवणे,डॉ.वसंत पवार,प्रा.मनोज महेर,डॉ.करण सातुरे,प्रा.किशोर तापडिया,प्रा. योगेश लाहमटे,डॉ. सतीश लोंढे,डॉ. शिवानंद मुंढे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. वैभव अंबरवाडीकर, प्रा. विजय शिंदे, प्रा. पी पी पवार,प्रा.किशोर खरात व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# आरोग्य तपासणी आणि जनजागृतीतून 'सेवा संकल्प'ची प्रभावी अंमलबजावणी

**जालना - प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद जालना आणि महिला व बाल विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत विविध आरोग्यविषयक उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शासन निर्णयानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानातून लोकाभिमुख, सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना देण्यात येत आहे.



अभियानांतर्गत जालना तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आन्वा येथे एएनसी क्लिनिक व एनसीडी कॅम्प आयोजित करण्यात आला. यावेळी गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक आरोग्य सेवा व मार्गदर्शन देण्यात आले. तसेच एनसीडी कॅम्पमध्ये नागरिकांची रक्तदाब, रक्तातील साखर आदींची तपासणी करून आजारांबाबत जनजागृती करण्यात आली.

उपस्थित लाभार्थ्यांना आरोग्यविषयक शिक्षण देऊन नियमित तपासणी व निरोगी जीवनशैलीचे महत्त्व पटवून देण्यात आले.

या आरोग्य शिबिरामुळे परिसरातील नागरिकांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, आरोग्यविषयक जनजागृती वाढण्यासोबतच विविध आजारांचे स्थानिक पातळीवर निदान व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा उपलब्ध होण्यास मदत झाली.

प्रा. आ. केंद्र धावडा अंतर्गत सेलूद उपकेंद्रातील सरस्वती विद्यालय तसेच वाकुळणी येथील छत्रपती संभाजी विद्यालयात वय वर्षे १४ ते १५ मधील पाचवीच्या मुलींसाठी एचपीव्ही लसीकरणाबाबत जनजागृती करण्यात आली. यासाठी शाळा व्यवस्थापन समितीकडून संमतीपत्र घेऊन टॅबमध्ये माहिती भरण्याची कार्यवाही करण्यात आली.

# शांताबाई पडूळ यांचे निधन



**जालना -प्रतिनिधी**

मंठा रोडवरील प्रीतीसुधानगर नगरातील रो हाऊस येतील रहिवासी शांताबाई उत्तमराव पडूळ यांचे दिनांक ६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय ८० वर्षाचे होते, त्यांच्यावर येथील रामतीर्थ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले,

राम उत्तमराव पडूळ श्याम उत्तमराव पडूळ त्यांच्या पश्चात दोन मुले चार मुली नातवंडे जावाई असा मोठा परिवार आहे त्या राम पडूळ व श्याम पडूळ यांच्या आई होत्या तर दूरसंचार निगम चे निवृत्त अधिकारी विजय साबळे यांच्या सासुबई होत्या.

# निवडणूक तयारीत सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवावा - विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

## नोडल अधिकाऱ्यांच्या बैठकीत निवडणूक तयारीचा आढावा

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. मतपेट्या व पोलीस बंदोबस्ताच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांना जीपीएस यंत्रणा बसवून मुख्य नियंत्रण कक्षातून त्यांचे निरीक्षण करावे. मतदानापूर्वी पोलीस प्रशासन व संबंधित समितीची बैठक घेऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी योग्य समन्वय ठेवून नियोजन करावे, अशा सूचना निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या. विभागीय आयुक्त श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली नोडल अधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी निवडणूक



प्रक्रियेतील विविध बाबींचा आढावाप्रसंगी त्यांनी या सूचना दिल्या. यावेळी सहआयुक्त प्रताप काळे, मंजुषा मिसकर, रित्रा मेत्रेवार, देविदास टेकाळे, खुशालसिंह परदेशी तसेच विविध कक्षांचे नोडल अधिकारी उपस्थित होते. तसेच आठही जिल्ह्यातील जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जी.श्रीकांत म्हणाले, मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधांकडे विशेष लक्ष द्यावे. प्रत्येक केंद्रावर वीज, फर्निचर, पिण्याचे पाणी व उतारमार्ग यांसह आवश्यक सुविधा उपलब्ध असाव्यात. ऑक्टोबर महिन्यातील उष्णतेचा विचार करून आरोग्य सुविधांची व्यवस्था करावी. संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर सीसीटीव्हीची व्यवस्था करावी. सर्व मतदान केंद्रांवर छायाचित्रणाची व्यवस्था करण्याबाबतही आवश्यक कार्यवाही करावी. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष व संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यपद्धतीचे योग्य प्रशिक्षण द्यावे. ९, १६ व २२ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या प्रशिक्षणात मतपेटी सीलबंद करणे, मतपत्रिकेची घडी घालणे व टपाली मतपत्रिकेच्या नमुना १२ बाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके घ्यावीत. मतदान केंद्राध्यक्षांना निवडणूक प्रक्रियेबाबत तयार केलेले सादरीकरण दाखवावे. मतदान केंद्रे मोठ्या क्षेत्रात विखुरलेली असल्याने सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती करून त्यांना ऑनलाइन प्रशिक्षण द्यावे. प्रत्येक जिल्ह्यात आचारसंहिता कक्ष स्थापन करून प्राप्त तक्रारींवर तातडीने कार्यवाही करावी. माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती, निवडणूक समन्वय कक्ष (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.